# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः29.05.2025** **वारःगुरुवार**

1. खरीप पिकांच्या किमान आधारभूत किंमतींमध्ये वाढ,
2. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशमधील दोन रेल्वे बहुमार्गिका प्रकल्पांना मंजुरी,
3. देशात यंदाही अन्नधान्याचं विक्रमी उत्पादन,
4. शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत लोकसंख्याशास्त्राचं योगदान अमूल्य-उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन, आणि
5. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाच्या 681 कोटी 32 लाख रुपयांच्या विकास आराखड्याला प्रशासकीय मान्यता.

**मंत्रिमंडळ निर्णय**

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहारविषयक सल्लागार समितीनं 2025-26 या विपणन हंगामासाठी सर्व चौदा खरीप पिकांची किमान आधारभूत किंमत अर्थात एम एस पी वाढविण्यास मान्यता दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली अर्थविषयक सल्लागार समितीच्या बैठकीत हे निर्णय झाल्याचं माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्ली इथं बातमीदारांना सांगितलं.

गेल्या वर्षीच्या किमान आधारभूत किंमतींपेक्षा यंदा सर्वाधिक वाढ कारळाच्या दरामध्ये करण्यात आली असून हा दर आता प्रति क्विंटल 820 रुपये झाला आहे. नाचणी- 596 रुपये, कापूस-589 रुपये, आणि तिळासाठी 579 रुपये प्रति क्विंटल दर प्रस्तावित आहे. उत्पादन खर्चापेक्षा 50 टक्के अधिक दर यावेळी किमान आधारभूत किंमत निश्चित करताना ठेवण्यात आला असून तो आत्तापर्यंतचा सर्वाधिक दर असल्याचं वैष्णव यांनी नमूद केलं. देशातील 7 कोटी 71 लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे.

मंत्रिमंडळाने शेतकऱ्यांसाना 2025-26 साठी सुधारित व्याज सवलत योजना चालू ठेवण्यास मान्यता दिली आणि त्यासाठी आवश्यक दोन लाख सात हजार कोटी रुपये निधीची व्यवस्था केली आहे. किसान क्रेडिट कार्डद्वारे दिल्या जाणाऱ्या कर्जावरील व्याजाच्या दीड टक्के अनुदान यापुढेही दिलं जाईल.

सुकर रेल्वे प्रवास आणि प्रवाशांची सुरक्षितता यांना सर्वाधिक प्राधान्य देत मंत्रिमंडळानं महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशमधील रेल्वेच्या दोन बहुमार्गिका अर्थात मल्टीट्रॅकिंग प्रकल्पांना मान्यता दिली आहे. यामध्ये दिल्ली - चेन्नई रेल्वे मार्गावरच्या वर्धा ते बल्लारशा दरम्यान चौथ्या मार्गाचा समावेश आहे. या दोन प्रकल्पांमुळे भारतीय रेल्वेचं जाळं सुमारे 176 किलोमीटरनं वाढेल, असं वैष्णव यांनी सांगितलं.

**चौहान**

देशात यंदा अन्नधान्याचं विक्रमी 5 हजार तीनशे 39 लाख मेट्रिक टन उत्पादन होणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत दिली. गेल्या वर्षीपेक्षा हे उत्पादन साडेसहा टक्क्यांनी अधिक आहे. अन्नधान्य उत्पादनात 216 लाख मेट्रिक टनांनी वाढ झाल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**पाऊस बाधा**

राज्यात गेले 20 दिवस 34 तालुक्यांमध्ये झालेल्या पावसामुळं पिकांचं बाधित क्षेत्र आता 40 हजार हेक्टरवर पोहोचलं आहे. अमरावती, बुलडाणा, जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांना सर्वाधिक तडाखा बसल्याचं पुण्यातील कृषी विभागाच्या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. जमिनीला वाफसा लवकर येण्याची चिन्हं कमी असल्यानं खरीप हंगामातील पेरण्याही लांबण्याची शक्यता आहे.

**उपराष्ट्रपती**

जगात सर्वाधिक लोकसंख्येचा देश असलेल्या भारतात लोकसंख्याशास्त्रातलं संशोधन अभ्यासक्रमापुरतं मर्यादित राहता कामा नये, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. मुंबईत आंतरराष्ट्रीय लोकसंख्या विज्ञान संस्थेच्या दीक्षांत समारंभामध्ये ते बोलत होते. देशाला शाश्वत विकासाच्या दिशेने घेऊन जाण्यात लोकसंख्याशास्त्र अमूल्य योगदान देतं, यातल्या आकडेवारीच्या आधारे शाश्वत विकास, आर्थिक प्रगती, सामाजिक एकोपा, तसंच देशाच्या सुरक्षेततेच्या हिताची धोरणं आखता येतात, याकडे उपराष्ट्रपतींनी लक्ष वेधलं. लोकसंख्या, लोकशाही आणि विविधता हे नव्या भारताचे तीन आधारस्तंभ असून लोकसंख्येचा अभ्यास करणारे विद्यार्थी या तिन्ही स्तंभांच्या मध्यभागी राहून आकडेवारी आणि धोरणनिर्मिती यातला दुवा म्हणून महत्त्वाचं काम करू शकतात, असंही उपराष्ट्रपती म्हणाले.

**एनडीए**

पुण्यातल्या एनडीए अर्थात राष्ट्रीय संरक्षण अकादमीचा 148 वा दीक्षांत समारंभ सोहळा आज होत आहे. गोरखपूरच्या दीनदयाळ उपाध्याय विद्यापीठाच्या कुलगुरू प्राध्यापिका डॉक्टर पूनम टंडन मुख्य अतिथी आहेत.  उद्या होणाऱ्या दीक्षांत संचलनं सोहळ्याला मिझोरमचे राज्यपाल निवृत्त जनरल डॉक्टर विजय कुमार सिंग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. यंदा एनडीए मधून महिला कॅडेट्सची पहिली तुकडी उत्तीर्ण होणार असल्यानं हा दीक्षांत सोहळा ऐतिहासिक ठरणार आहे.

**विकास आराखडा**

अहिल्यानगर जिल्ह्याच्या जामखेड तालुक्यातील मौजे चौंडी इथल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळाच्या विकासासासाठी 681 कोटी 32 लाख रुपयांच्या विकास आराखड्यात प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. आराखड्यातील सर्व कामं मे 2028 पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं यंदा त्रिजन्मशताब्दी वर्ष असून त्यानिमित्तानं चौंडी इथं 6 मे रोजी राज्य मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार काल उपमुख्यमंत्री

अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या नियोजन विभागाच्या बैठकीत याबाबतचा शासननिर्णय जारी करण्यात आला.

**<u>तुळजापूर-धाराशिव</u>**

तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकासाकरिता 1 हजार 865 कोटी रुपयांच्या आराखड्याला प्रशासकीय मान्यता दिल्याचा शासन निर्णय काल जारी करण्यात आला आहे. या आर्थिक वर्षापासूनच त्याची अंमलबजावणी होणार आहे.

**<u>तणमोर-रत्नागिरी</u>**

माळढोक पक्ष्याच्या प्रजातीतला अतिशय दुर्मिळ तणमोर पक्षी रत्नागिरी जिल्ह्यातल्या कातळसड्यावर आढळून आला आहे. तणमोर रत्नागिरीत प्रथमच आढळल्याचं पक्षी निरीक्षकांचं म्हणणं आहे. आमच्या प्रतिनिधीचा हा वृत्तांत...

**रत्नागिरीतले पक्षिनिरीक्षक ॲडव्होकेट प्रसाद गोखले यांना एका कातळसड्यावर माळढोकच्या प्रजातीतल्या तणमोर अर्थात लेसर फ्लोरिकन या पक्ष्याचं दर्शन झालं. खरबट रंगाच्या या मादी पक्ष्याचं छायाचित्र त्यांनी टिपलं. याआधी कधीही रत्नागिरीत तणमोर पक्षी दिसल्याची नोंद नाही. तसंच, 1938 नंतर संपूर्ण कोकणातही हा पक्षी कधी दिसल्याची नोंद झालेली नाही. इंटर्नॅशनल युनियन फॉर काँझर्व्हेशन ऑफ नेचर या संस्थेच्या नोंदीनुसार हा पक्षी क्रिटिकली एंडेजर्ड अर्थात नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर असून, अस्तित्वात असलेल्या तणमोरांची संख्या हजारभरही नाही. हा पक्षी राजस्थान, गुजरातमध्ये प्रजनन करतो आणि नंतर आंध्र प्रदेश, कर्नाटकात जातो. तिथून परतीच्या प्रवासात असताना हा पक्षी खराब वातावरणामुळे किंवा दमल्यामुळे रत्नागिरीत उतरला असावा, अशी शक्यता पक्षितज्ज्ञांनी वर्तवल्याचं गोखले यांनी सांगितलं. हा पक्षी दिसला तिथे याआधीही काही दुर्मीळ पक्ष्यांचं दर्शन झालं होतं. यातून कातळसड्यांचं जैवविविधतेच्या दृष्टीने असलेलं महत्त्व अधोरेखित झालं आहे. पक्षिनिरीक्षकांनी कातळसड्यांच्या संवर्धनाचं काम करावं, निरीक्षण करून नोंदी कराव्यात, जेणेकरून त्यांच्या स्थलांतराच्या मार्गासह अन्य बाबींचं संशोधन करता येऊ शकेल, असं आवाहन गोखले यांनी केलं आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी.**

**<u>बसची पाहणी</u>**

एसटी महामंडळाच्या ठाणे-नागपूर दरम्यान चालवण्यात येणाऱ्या 'स्मार्ट बस'मध्ये बसवण्यात आलेल्या आयटी सुरक्षा प्रणालीची पाहणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल ठाणे इथं केली. या प्रणालीमुळं नवीन बसगाड्या प्रवासाकरिता अधिक सुरक्षित असतील, असा विश्वास शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

**<u>बोगस खत-भंडारा</u>**

भंडारा जिल्ह्यात लाखनी इथं कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्रात सुमारे 129 मेट्रिक टन बनावट मिश्र खतांचा साठा आढळून आला आहे. या खतांच्या नमुन्याची अमरावतीमधल्या खत नियंत्रण प्रयोगशाळेत तपासणी केली

असता ते नमुने अप्रमाणित ठरले. संबंधित खत उत्पादन कंपनी आणि वितरक तसंच विक्रेत्यांकडे महाराष्ट्र राज्यातील खत उत्पादन आणि विक्रीसंबंधी कोणतेही परवाने नसल्याचंही तपासात उघडकीस आलं.

**बांबू-कोल्हापूर**

बांबू उत्पादक शेतकऱ्यांनी बांबू उत्पादनाचे 'ब्रँड ॲम्बेसिडर' बनून जिल्ह्यात बांबूचं क्षेत्र वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत, असं आवाहन कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केलं. विविध संस्थांद्वारे संयुक्तपणे कणेरी मठ इथल्या कृषी विज्ञान केंद्रात आयोजित बांबू लागवड तंत्रज्ञान कार्यशाळेत ते बोलत होते. श्रीसिद्धगिरी मठाचे काडसिद्धेश्वर स्वामीजी यावेळी उपस्थित होते.

**जलजीवन-यवतमाळ**

यवतमाळ जिल्ह्यात जलजीवन मिशनची अनेक प्रलंबित कामं तातडीनं पूर्ण करा, कामांसाठी निधी नाही, अशी कारणं सांगता येणार नाहीत. या कारणांसाठी कामं थांबविणाऱ्या कंत्राटदारांची देयकं थांबवा. चांगलं काम करणाऱ्या कंत्राटदारांची देयकं आधी द्या, असे निर्देश यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले. जिल्हा पाणी आणि स्वच्छता मिशनचा आढावा घेताना ते काल बोलत होते.

**विखे पाटील-अहिल्यानगर**

अहिल्यानगर जिल्ह्यात पावसामुळे मोठं नुकसान झालं असून नुकसानाचे सरसकट पंचनामे अधिकचं मनुष्यबळ उपलब्ध करून तातडीनं करावेत. शासनाच्या स्थायी आदेशाप्रमाणे आपतीग्रस्तांना मदत मिळेलच, परंतू विशेष बाब म्हणूनही मदत आणि पुनर्वसन विभागाकडे मदतीचे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना जलसंपदामंत्री आणि अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल दिल्या. या संकटप्रसंगी सरकार पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही त्यांनी दिली. जिल्हयात पावसानं झालेल्या नुकसानीची पाहणी विखे पाटील यांनी नगर तालुक्यातील सोनवाडे, खडकी आणि वाळकी या गावांना भेटी देऊन केली. त्यावेळी ते बोलत होते.

**झाड**

पुण्यात एका रिक्षावर झाड पडल्यामुळं काल एका महिलेचा मृत्यू झाला. पेशवे उद्यानाजवळ चालत्या रिक्षेवर झाड पडून ही घटना घडली. झाड पडल्यानं मृत्यू झाल्याची पुण्यातली अलिकडची ही दुसरी घटना आहे.

**हवामान**

कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**